0 5 JUN 2025

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# देशातील 'टॉप १०' संशोधकांमध्ये प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील

## मटेरियल सायन्स विषयावर संशोधन

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

मटेरियल सायन्स या विषयामध्ये देशातील आघाडीच्या दहा संशोधकांमध्ये शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू तथा जागतिक कीर्तीचे संशोधक डॉ. पी. एस. पाटील यांचा समावेश झाला आहे. 'रिसर्च डॉट कॉम' या संशोधन मंचाने सन २०२४ ची विविध विषयांतील जागतिक आघाडीच्या संशोधकांची यादी नुकतीच जाहीर केली. त्यामध्ये डॉ. पाटील मटेरियल सायन्समधील संशोधनात देशात नवव्या स्थानी आहेत.

मटेरियल सायन्समधील संशोधनात डॉ. पाटील यांचे संशोधकीय निर्देशांक उच्च दर्जाचे आहेत. त्यांच्या संशोधनाचा एच-इंडेक्स ९४, आय-१० इंडेक्स ५४० तर डी-इंडेक्स ८८ इतका आहे. त्यांचे ६०० हून अधिक शोधनिबंध आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय शोधपत्रिकांतून प्रसिद्ध झाले आहेत. संशोधनास ३३,८८० सायटेशन्स मिळाली आहेत. संशोधकांनी त्यांच्या शोधनिबंधांचे संदर्भ आपल्या संशोधनात दिले आहेत. रिसर्च डॉट कॉमने सन २०२४ मध्ये विषयनिहाय जाहीर केलेल्या आकडेवारीमध्ये डॉ. पाटील यांना मटेरियल सायन्समध्ये देशातील पहिल्या १० संशोधकांमध्ये आणि जागतिक स्तरावर १५१२ वे स्थान मिळाले आहे.



अमेरिकेच्या स्टॅनफोर्ड विद्यापीठाने जाहीर केलेल्या जागतिक आघाडीच्या दोन टक्के संशोधकांच्या यादीतही त्यांचे स्थान वरचे आहे, तर ए.डी. सायंटिफिक निर्देशांक आकडेवारीतही त्यांचा समावेश आहे.

डॉ. पाटील शिवाजी विद्यापीठातील भौतिकशास्त्र विभागाचे वरिष्ठ प्राध्यापक असून, मटेरियल सायन्सच्या क्षेत्रात गेल्या ३५ वर्षांपासून अध्यापन व संशोधन करीत आहेत. नॅनोमटेरियल्स, थिन फिल्म्स आणि ऊर्जा साठवणुकीच्या क्षेत्रात संशोधन आहे. ही क्षेत्रे आधुनिक तंत्रज्ञानाच्या विकासासाठी अत्यंत मूलभूत मानली जातात. या संशोधनाचा उपयोग सौर ऊर्जा, बॅटरीज आणि सेन्सर्स यांसारख्या उपकरणांमध्ये होतो. त्यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक विद्यार्थ्यांनी पीएच.डी. केली आहे. त्यांना अनेक राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पुरस्कारांनी सन्मानित केले आहे. जर्मनीची डॅड फेलोशिप, इंग्लंडची इन्स्टिट्यूट ऑफ फिजिक्सची फेलोशिप व दक्षिण कोरियाची ब्रेन पूल यांचा समावेश आहे. नॅशनल अकॅडमी ऑफ सायन्स इंडिया, अलाहाबाद आणि महाराष्ट्र अकॅडमी ऑफ सायन्स यांचे ते फेलो आहेत. त्यांची चार आंतरराष्ट्रीय पुस्तके प्रकाशित असून त्यांच्या नावावर सात पेटंटही आहेत.

### मटेरियल सायन्समध्ये संशोधनाच्या व्यापक संधी

मटेरियल सायन्स हे माझ्या आवडीचे संशोधनाचे क्षेत्र असल्यामुळे या क्षेत्रात दर्जेदार संशोधनकार्य करता आले. मटेरियल सायन्सच्या क्षेत्रात संशोधनाच्या व्यापक संधी असून भविष्यातही संशोधन करण्याचा प्रयत्न करीन. शिवाजी विद्यापीठ या क्षेत्रात राष्ट्रीय पातळीवर आघाडीवर आहे. ही आघाडी टिकविण्यासाठी नवसंशोधकांना प्रेरित करीत राहणे आवश्यक आहे.

-डॉ. पी. एस. पाटील (प्र-कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ)

### शिवाजी विद्यापीठाची प्रतिष्ठा वृद्धिंगत

डॉ. पाटील यांचे यश केवळ त्यांच्या वैयक्तिक कठोर परिश्रमाचे द्योतक नाही, तर शिवाजी विद्यापीठ परिवारासाठी आणि एकूणच भारतीय विज्ञान क्षेत्रासाठी अभिमानास्पद बाब आहे. त्यांच्या या यशामुळे शिवाजी विद्यापीठाची प्रतिष्ठा राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर वृद्धिंगत झाली आहे. त्यांचे हे यश विद्यापीठातील युवा संशोधकांना दर्जेदार संशोधनासाठी प्रेरित करेल. -डॉ. डी. टी. शिर्के (कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ)

0 5 JUN 2025

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

सकाळ

# प्रश्न विचारा, पारदर्शकतेचा आग्रह धरा

## आमदार जयंत पाटील : 'सकाळ यिन समर यूथ समीट'ची दिमाखदार सांगता

■ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. ४ : देशाची सद्यस्थिती पाहता युवकांची जबाबदारी येत्या काळात महत्त्वाची राहणार आहे. जेथे चुकते तेथे प्रश्न उपस्थित करताना व्यवस्थेतील पारदर्शकतेचा आग्रहही तरुणाईने धरायला हवा, असे मत आज राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे प्रदेशाध्यक्ष, आमदार जयंत पाटील यांनी व्यक्त केले. शिवाजी विद्यापीठातील राजमाता जिजाऊसाहेब बहुउद्देशीय सभागृहात 'यिन समर यूथ समीट-२०२५'च्या सांगता कार्यक्रमात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे होते.

दरम्यान, 'समीट'चे मुख्य प्रायोजक डॉ. पियू हाईट क्लिनिक, तर पॉवर्ड बाय पिंपरी-चिंचवड युनिव्हर्सिटी होती. विद्याप्रबोधिनी कोल्हापूरचे सहकार्य मिळाले. ट्रिनिटी ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट, फ्युएल बिझनेस स्कूल, महा एनजीओ फेडरेशन सहप्रायोजक, तसेच शिवाजी विद्यापीठ व्हेन्यू, संजीवन

पान ७ वर >



### आमदार पाटील म्हणाले...

- कुठल्याही क्षेत्रात जा, त्यातील सखोल ज्ञान आणि वक्तृत्व चांगले असायलाच हवे.
- वृत्तपत्रांबरोबरच सोशल मीडियातून चालू घडामोडींबाबत माहितीवर भर द्या.
- राज्यकर्त्यांबाबतचे लोकांचे समज आता बदलू लागले आहेत. त्यामुळे व्यवस्थेतील अडचणी नेमक्या काय आहेत, याचाही बारकाईने अभ्यास करा.
- व्यवस्थेमध्ये पारदर्शकतेचा अभाव दिसतो. त्याबाबतचा आग्रह धरताना गुणवत्तेला प्राधान्य मिळाले पाहिजे, अशीच भूमिका ठेवायला हवी.

# प्रश्न विचारा, पारदर्शकतेचा आग्रह धरा

> पान १ वरून

नॉलेज सिटी (पन्हाळा) हॉस्पिटॅलिटी, तर जनता सहकारी बँक लिमिटेड बँकिंग पार्टनर होते.

आमदार जयंत पाटील यांनी आपल्या खास शैलीत उपस्थित तरुणाईशी संवाद साधला. किती जणांना राजकारणात यायचे आहे, किती जणांना राजकारणात यायचेच नाही, असे विविध प्रश्न विचारून त्यांनी माहोलाचा अंदाज घेतला आणि एकूणच देशाची सद्यस्थिती, बदलते राजकारण आणि तरुणाईची भूमिका अशा विविध अंगांना स्पर्श करत संवाद पुढे नेला. ते म्हणाले, 'करिअर हे तरुणाईसमोरचे सध्याचे ध्येय असले, तरी आपल्या सभोवताली कोणत्या घटना, घडामोडी घडतात, याचीही त्यांना माहिती हवी. सजग नागरिक म्हणून या सर्व घडामोडींकडे अभ्यासू वृत्तीने पाहायला हवे. आजवरचा इतिहास पाहिला, तर जो उत्तम शिकला तोच पुढे गेला. सद्यस्थिती पाहता आता जगातील कोणत्याही कोपऱ्यात जाऊन तुम्हाला शिकता येते आणि तेथेच आपल्या आवडीच्या क्षेत्रात करिअरही घडवता येते.'

'गुणवत्तेच्या जोरावरच जगातले अनेक देश पुढे गेले आहेत. स्त्री-पुरुष समानतेचा पुरस्कार करत ते प्रगत देश ठरले आहेत. एकूणच सर्वच क्षेत्रांत स्पर्धा वाढली असून, त्यातून जागरूकताही निर्माण होऊ लागली आहे. व्यवस्थेबद्दल हळूहळू प्रश्न विचारले जाऊ लागले आहेत. छत्रपती शिवाजी महाराज आपले आदर्श आहेत. पण, हळूहळू इतिहास बदलून तो समाजावर बिंबवण्याचा प्रयत्न जाणीवपूर्वक केला जाऊ लागला आहे. पानिपतच्या लढाईत नेमके कोण हरले, इथपासून ते छत्रपती संभाजी महाराजांच्या शौर्यापर्यंत प्रत्येक गोष्ट तरुणाईने बारकाईने अभ्यासली पाहिजे', असेही आमदार पाटील म्हणाले.

### प्रशासनातील राजकीय हस्तक्षेप

■ अलकीडच्या काळात बदलीला घाबरणारी व्यवस्था तयार झाली आहे. प्रशासनातील राजकीय हस्तक्षेप वाढल्यानेच असे चित्र निर्माण झाले आहे. त्यामुळे राजकारणात येणाऱ्या तरुणाईला या साऱ्या गोष्टींची जाणीव आवश्यक आहे. दूरचित्रवाणी वाहिनीवरील युध्दाच्या बातम्या आपण पाहिल्या. पण, पाकव्याप्त काश्मीर घेण्याची संधी असतानाही प्रत्यक्षात युध्द का थांबले, असा प्रश्न आता हळूहळू सामान्य माणूसही उपस्थित करू लागला आहे. या साऱ्या पार्श्वभूमीवर कान आणि डोळे उघडे ठेवूनच तरुणाईने कार्यरत असायला हवे, असेही आमदार पाटील म्हणाले.

कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे म्हणाले, 'एकूणच सामाजिक परिस्थिती पाहता मूल्यांची घसरण होत चालली आहे. पैशाला नको इतके महत्त्व आले आहे. सन्मानाने जगण्यासाठी जेवढा पैसा आवश्यक आहे, तेवढा मिळवायलाच हवा. येत्या काळात अठरा ते तीस टक्के लोक नैसर्गिक आपत्तीचे बळी ठरतील, अशी शक्यता आहे. कारण आपण निसर्गाचे नको तेवढे नुकसान केले आहे. पाण्याचा विचार करता पुनर्भरणावर भर द्यावा लागणार आहे. या साऱ्या गोष्टींकडे तरुणाईने सजगपणे पाहायला हवे. छत्रपती शिवाजी महाराज यांचा केवळ जयजयकार करून चालणार नाही, तर ते आपल्या हृदयात आणि डोक्यात असायला हवेत. जेव्हा आपण छत्रपती शिवाजी महाराजांना आदर्श मानतो तेव्हा कितीही अडचणी आल्या तरी निराशेचा मनाला जरासाही स्पर्श होऊ देऊ नका.'

युवा वक्ता विवेक कोकरे यांनी शिवाजी विद्यापीठ आणि 'यिन'मुळेच घडल्याचे आवर्जून सांगितले. 'सध्याच्या एकूणच गढूळ वातावरणात युवकांची जबाबदारी मोठी आहे. बोलणाऱ्यांचा आवाज बंद केला जात आहे. शेतकरी, सर्वसामान्यांच्या प्रश्नाकडे जाणीवपूर्वक डोळेझाक केली जात आहे. त्यामुळे आता जेथे चुकीचे घडते, तेथे तरुणाईने ठाम भूमिका घेऊन प्रश्न विचारायलाच हवेत. लोकशाही आणि संविधानासाठी प्रत्येक गोष्टीकडे सजगपणे पाहायला हवे', असे ते म्हणाले.

दरम्यान, कार्यक्रमात विविध महाविद्यालयांच्या प्रतिनिधींचे सत्कार झाले. 'सकाळ'चे संपादक निखिल पंडितराव, योग-आहार व उंची विशेषज्ञ डॉ. पियू धनवडे, विद्या प्रबोधिनीचे संचालक राजकुमार पाटील प्रमुख उपस्थित होते. 'सकाळ'चे सरव्यवस्थापक (दक्षिण महाराष्ट्र) यतीश शहा यांनी आभार मानले. प्रभंजन नलवडे याने सूत्रसंचालन केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
05 JUN 2025
लोकमत

# 'घाळी'मध्ये नव्या अभ्यासक्रमांना मंजुरी

**गडहिंग्लज :** येथील डॉ. घाळी महाविद्यालयाला २०२५-२०२६ या शैक्षणिक वर्षापासून बी.एस्सी. विद्यार्थ्यांसाठी आर्टिफिशियल इंटेलिजन्स (ए. आय.), डेटा सायन्स या नव्या अभ्यासक्रमांना महाराष्ट्र शासनाची व शिवाजी विद्यापीठाची मान्यता मिळाली आहे, अशी माहिती संस्थेचे अध्यक्ष डॉ. सतीश घाळी यांनी दिली. वरील अभ्यासक्रम पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांना डाटा सायंटिस्ट, डाटा ॲनालिटीक्स, मशीन लर्निंग, इंजिनिअर, बिझनेस इंटिलिजन्स ॲनालिस्ट, डाटा इंजिनिअर, रिसर्च सायंटिस्ट, डाटा कन्सलटंट म्हणून नोकरीची संधी मिळणार आहे, असेही प्राचार्य डॉ. दत्ता पाटील यांनी सांगितले.